I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 218-223
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# किशोरांच्या वर्तनावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन

**सोनाली डी. पारधी**
महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर,
*Corresponding Author :- sonalipardhi1981@gmail.com

Communicated : 30.01.2023 | Revision : 07.03.2023 Accepted : 05.04.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

या शोध निबंधामध्ये किशोरांचे वर्तन व त्यावर परिणाम करणारे घटक यावर संशोधन करण्यात आले. पार्श्वभूमी: विशिष्ट परिस्थितीमध्ये मुलांची होणारी प्रतिक्रीया म्हणजे वर्तन होय. किशोरावस्थेत अनेक शारिरीक बदल व हार्मोन्स परिवर्तन होतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये उदासीनता, बेचैनी, व्याग्रतांचे प्रमाण वाढते. मुलांच्या सर्वांगीण विकासात सकस व पर्याप्त आहार, निरोगी व उत्तम स्वास्थ आवश्यक असते. परंतु बरेचदा निरोगी असूनही किशोरावस्थेतील शरिरातील काही लैंगिक व मानसिक ग्रंथीमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा परिणाम मुलांवर होतो व त्यातून किशोरांचे वर्तन घडून येते. पध्दती: याकरीता चंद्रपूर जिल्ह्यातील ५ तालूक्यातील १५ ते १८ वयोगटातील ६० किशोरांची ज्यामध्ये ३० किशोर व ३० किशोरींचा यामध्ये समावेश करण्यात आला. साधने: प्रस्तुत संशोधनात किशोरांचे वर्तन जाणूण घेण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. या प्रश्नावलीत किशोरांचे वर्तन व त्यावर परिणाम करणारे अंतर्गत, बहीर्गत घटक, त्यांच्या वर्तनावर होणारा आर्थिक, सामाजिक, तसेच शैक्षणिक घटकांचा परिणाम पाहण्यासाठी प्रश्नावलीचे ८ विभागात विभाजन करण्यात आले. न्यादर्शाची निवड करून निर्देशन सर्वेक्षण पद्धतीद्वारे किशोरांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. निष्कर्ष: या संशोधातून पालकांचे शिक्षण व किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले. कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले. कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

**मुख्यशब्द :** किशोरावस्था, वर्तन, शारीरिक, मानसिक.

## प्रस्तांवना :

किशोरावस्था म्हणजे मनुष्याच्या जीवनातील अशी एक अवस्था की ज्या अवस्थेत तो बाल अवस्थेतून स्वतंत्र प्रज्ञेच्या प्रौढ व्यक्तीमध्ये स्थित्यंतर होण्याच्या मधील हा आठ वर्षाचा दीर्घकाळ असतो. या काळात बालसुलभ वैशिष्टये हळूहळू कमी होऊ लागतात आणि प्रौढ तरूणाच्या बाबतीत शोभून दिसावी अशी वैशिष्ट्चे संपादन केली जातात. ह्या काळात मुलामुलींना लैंगिक फरकाचीही जाण येते. उत्साह, अधिकारवृत्ती, धाडसीपणा, भक्ती अणि निष्ठा, काहीतरी केले पाहिजे अशी धडपड, अशी तारूण्यसुलभ लक्षणे किशोरांच्या आचार आणि विचारातून स्पष्टपणे दिसून येऊ लागतात. किशोरावस्थेची व्याख्या आणि वर्णन अनेक दृष्टिकोणातून करण्यात आलेली आहे. लैंगिक परिपक्वतेचा प्रारंभ होण्याच्या काळापासून परिपूर्ण लैंगिक विकास होईपर्यंतच्या जैव प्रक्रियेला अनुसरून किशोरावस्थेचा विचार केला जातो. व्यक्तीच्या वयाचा विचार करता १२ ते २० वर्षांपर्यंतचा काळ किशोरावस्था म्हणून ओळखला जातो. व्यापक अर्थाने विचार केल्यास बाल्यावस्था आणि परिपक्व प्रौढावस्था या दोहोंमधील संक्रमण काळ म्हणजे किशोरावस्था होय. मुलामुलींची शारीरिक, मानसीक, सामाजिक, भावनात्मक व नैतिक विकास पूर्ण होण्याच्या प्रक्रियेचा हा काळ होय.

किशोरांची संवेदनशिलता, कौशल्य, संबंध टिकविण्याची कला, बांधिलकी, गुणग्राहकता, आस्था, आदरतिथ्य, नेतृत्व, जबाबदेरी, सामाजिक सहभाग या नानाविध गुणांचा विकास कितपत झालेला आहे, हे जाणून घेणे गरजेचे आहे. संशोधनाच्या उद्दीष्टानुसार किशोरांच्या वर्तनाचा शोध घेण्याच्या उद्देशाने प्रस्तूत संशोधन महत्वाचे आहे.

आधुनिक काळात आपण समाज माध्यमांना नाकारू शकत नाही कारण ती काळाची गरज आहे. पण त्यांचा वापर करतांना पालकांनीही काही दक्षता घेणे गरजेचे आहे परंतु तसे होतांना दिसत नाही. Mobilel चा प्रभाव आज किशोरांवर वाढत चालला आहे. फक्त Mobile च नाही तर, T.V., इंटरनेट, संगणक या सर्वांचा प्रभाव खुपच वाढला आहे.आजच्या आधुनिक काळात किशोरवयीन मुलांवर प्रसार माध्यमांचा कुटुंबापेक्षा जास्त प्रभाव आढळून येतो व त्याचा त्यांच्या वर्तनावरही परिणाम होतो. त्यामुळे नकळत Media त्यांच्या

व्यक्तिमत्वाचा भाग होत चालले आहेत. मुलांच्या Potential आणि Spark ला Chanelize करण्यात Media चा मोठा वाटा असतो. खरतर media मुळे मुले बरेच काही शिकू शकतात. Creative thinking, literary skillआणि त्यांच्या career विषयी इंत्यादी.

वर्तन म्हणजे आजूबाजूच्या उद्दीपक घटकांना व्यक्तींनी दिलेली प्रतिक्रीया होय. वर्तनाचे अंतर्गत व बाहय वर्तन असे दोन प्रकार आहेत. बाहय वर्तनात चालणे, खेळणे, नृत्य करणे, गाणे, भांडणे अशा अनेक गोष्टी येतात ज्याचे बाहेरून निरीक्षण करता येते. अंतर्गत वर्तनात मानसिक क्रिया येतात जसे भावना विचार करणे, आठवणे, विचारणे ज्याचे निरीक्षण होऊ शकत नाही. व्यक्ती ज्याप्रकारे समस्या व घटनांना प्रतिक्रीया देते यामधून त्याचे मानप होऊ शकते.

इसवी सन १९०० सालानंतर किशोरवयाच्या मानसशास्त्राचा औपचारीक अभ्यास सुरू झाला. पन १९८० पर्यंत त्यांचा भर या वयातील वर्तणुकीचे आकृतीबंध समजून घेणे आणि त्याचे वर्णन करणे यावरच होता. त्यानंतर विशेषत: मेंदूच्या कार्याबद्दल अधिक ज्ञान व्हायला लागल्यानंतर, या वर्तनुकीचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न होऊ लागला. अनेक मानसशास्त्रज्ञांच्या अभ्यासानंतर आता किशोरवयातील वर्तणून आणि त्यामागची कारणे समजू लागली आहेत.

किशोरावस्थेतील मुलांच्या उत्स्फूर्त वर्तणुकीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न, जबाबदारी जाणण्याचा व पेलण्याचा प्रयत्न करतात. नाविण्याची ओढ व नवनिर्मितीच्या इच्छेमुळे या वयातील मुले उत्साही, अस्वस्थ, अस्थिर व स्वप्नाळू वृत्तीची वाटतात. ती अधिक साहसी बेधडक, बेदरकार व निर्भय असतात. संकटाला/प्रश्नाला भिडण्याची त्यांची वृत्ती असते. पण त्याचबरोबर धोक्याचे मोजमाप करून व पारखून धोका पत्करण्याच्या क्षमतेचा विकास करण्याचा व शारीरिक/मानसिक ताण-तणाव सहन करण्यासाठी सहनशक्ती वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांना सतत शंका येतात, प्रश्न पडतात न कळणाऱ्या गोष्टींनी ती अस्वस्थ होतात. न पटणाऱ्या गोष्टींसाठी वादविवाद करतात. एखादी गोष्ट जशीच्या तशी, कुणी सांगीतली म्हणून, स्वीकारण्यास ती तयार नसतात. त्यामूळे त्यांच्या स्वभावात बंडखोरी येते. या वयातील मुलांचे वडीलांबरोबर व मुलींचे आईबरोबर पटत नाही व त्यांच्या नात्यात व वर्तणुकीत बदल होतो.

**क्वीडवई** (२०१०) यांनी विकसनशील देशातील सर्वेक्षणातून किशोरवयीन मुलांची जीवनशैली आणि वर्तन या विषयावर अभ्यास केला. अभ्यासाअंती सूचीत करण्यात आले की. लोकसंख्येचा फार मोठा भाग असलेल्या किशोरांना महत्व देणे गरजेचे आहे. व त्यांच्या आरोग्य व जीवनशैलीच्या समस्या लक्षात घेणे व त्याचे निराकरण करणे महत्वपूर्ण आहे. अपूरी झोप, नैराश्य व धुम्रपान हे किशोरांच्या अस्वास्थ्याचे कारण असल्याचे आढळून आले. **वाय. ए. जोन्सन आणि बी. के. आश्रा (२०१३) यांनी** "जन्मक्रमानुसार बालकाचे कौटुंबीक संबंध सामाजिक वर्तन यातील संबंध" या अभ्यासात त्यांनी ६० मुलांचा नमुना निवडला. तथ्य विश्लेषणाकरीता टी-टेस्ट आणि सहसंबंध या सांख्यिकीय पध्दतीद्वारे प्रथम जन्मणाऱ्या व दुसऱ्या जन्मणाऱ्या मुलांच्या कौटुंबीक संबंधात कोणताही सार्थक फरक नाही. तसेच सामाजिक वर्तनात देखील सार्थक फरक नाही. तसेच किशोरवयीन मुलं अणि मुलींच्या वर्तन शैली व समायोजन स्तरात कोणताही सार्थक सहसंबंध आढळून आला नाही. **निओगी, सुस्मिता आणि दास, चमेली** (२०१७)यांनी "महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील जोखीम घेण्याच्या वर्तनावर कौटुंबीक संबंधाचा परिणाम" शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कोलकत्ताच्या वेगवेगळ्या महाविद्यालयातील (५० मुले व ५० मुली) अशा १०० विद्यार्थ्यांच्या अध्ययनातून स्वीकार्यता अणि एकाग्रतेचा जोखीम घेण्याच्या वर्तनाशी सकारात्मक सहसंबंध आढळून आला. पालकांची स्वीकार्यता व अस्वीकार्यता यांचा जोखीम घेण्याच्या वर्तनावर महत्वपूर्ण परिणाम होतो असे आढळून आले. परंतु पालकांच्या एकाग्रतेचा कोणताही प्रभाव पडत नाही असे निदर्शनास आले होते. तसेच लिंगाचा सकारात्मक प्रभाव आढळून आला. मुलींच्या तुलनेत मुलांमध्ये जोखीम घेण्याचे अधिक्य दिसून आले. व जोखीम घेण्याच्या वर्तनावर राहणीमानाच्या दर्जाचाही परिणाम होतो असे आढळून आले होते. **लू. ल्युइन** (२०१९) यांनी "पालक-किशोर संबंध आणि जोखीम घेण्याचे वर्तन" यावर अध्ययन केले.यासाठी नमूना म्हणून ११ ते १९ वयोगटीतील

९१७ चिनी किशोरवयीन विद्यार्थ्यांचा समावेश होता. संशोधनाअंती सूचीत करण्यात आले की, पालकांचे समर्थन किंवा पालक-किशोरांचे संघर्ष आणि किशोरांचे जोखीम घेण्याचे वर्तन यांच्यातील संबंध हे आत्मनियंत्रणाद्वारे नियंत्रित केले गेले.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) किशोरावस्थेची संकल्पना समजून घेणे.

२) किशोरावस्थेतील वैकासिक बदल अभ्यासणे.

३) किशोरवयीन मुलांच्या पालकांचे शिक्षण व किशोरांचे वर्तन यातील सहसंबंध अभ्यासणे.

४) किशोरवयीन मुलांच्या वर्तनास कारणीभूत ठरणारे बहीर्गतव अंतर्गत घटक जाणून घेणे.

**संशोधन गृहितकृत्ये :**

१) पालकांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे वर्तन यांत सार्थक संबंध आहे.

२) कौटुंबीक सदस्य संख्या व किशोरांचे वर्तन यांत सार्थक संबंध नाही.

३) कुटुंबाचा प्रकार आणि किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध असतो.

**संशोधन कार्यपद्धती :**

या संशोधनाकरीता प्राथमिक पध्दती किंवा स्त्रोत चा आधार घेण्यात आला. प्राथमिक तथ्ये प्राप्त करण्यासाठी संशोधन क्षेत्रात जाऊन संशोधन समस्येशी संबंधीत असणाऱ्या व्यक्तिशी संपर्क साधून प्रश्न विचारून स्वरचीत प्रश्नावलीच्या सहाय्याने तथ्ये आणि माहिती संकलीत करण्यात आली. प्रश्नावलीत संशोधन विषयाशी संबंधीत प्रश्नांचा समावेश करण्यात आला. याकरीता चंद्रपूर जिल्ह्यातील १५ ते १८ वयोगटातील ६० किशोरांची यासाठी निवड करण्यात आली. **पध्दती:** प्रस्तूत संशोधनातील किशोरांचे वर्तन जाणूण घेण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली. या प्रश्नावलीत किशोरांचे वर्तन व त्यावर परिणाम करणारे अंतर्गत, बहीर्गत घटक, त्यांच्या वर्तनावर होणारा आर्थिक, सामाजिक, तसेच शैक्षणिक घटकांचा परिणाम पाहण्यासाठी प्रश्नावलीचे ८ विभागात विभाजन करण्यात आले. न्यादर्शाची निवड संभाव्यता नमूना निवड प्रकारातील साधा यादृच्छिक नमूना पद्धतीद्वारे ६० किशोर व किशोरींची निवड करून निर्देशन सर्वेक्षण पद्धतीद्वारे किशोरांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. ज्ञानप्राप्तीकरीता निरीक्षण, वर्गीकरण, निष्कर्ष या शास्त्रीय पद्धतीवर आधारीत तसेच सध्याच्या काळात सर्वात जास्त प्रचलीत असलेली निर्देशन सर्वेक्षण पद्धती आहे.

**महितीचे संकलन व विश्लेषण:**

**परिकल्पना क्र. १:** पालकांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध नाही.

**अर्थनिर्वचन:**

- वरील सारणीचे तुलनात्मक अध्ययन केले असता, वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे सामाजिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 2.75 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, म्हणजेच वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे सामाजिक वर्तन यात सार्थक संबंध आहे असे आढळून आले.

- तसेंच वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे असामाजिक. वर्तन याचे परिगणीत मूल्य 3.75 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे असामाजिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

- वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे नैतिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 1.02 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे नैतिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

- तसेच वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे शारिरीक वर्तन याचे परिगणीत मूल्य 2.46 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे शारिरीक वर्तन यात सार्थक संबंध आहे.

- वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे भावनिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 0.48 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे भावनिक वर्तन यात सार्थक संबंध आहे.

- वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे लैगिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 0.48 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. वडीलांचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे लैगिक वर्तन यात सार्थक संबंध आहे.

**अर्थनिर्वचन:**

- आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे असामाजिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 0.01 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे सामाजिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

- आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे सामाजिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 2.22 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे सामाजिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

- आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे नैतिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 10.4 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे नैतिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

- तसेच आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे शारिरीक वर्तन याचे परिगणीत मूल्य 3.45 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे शारिरीक वर्तन यात सार्थक संबंध आहे.

- आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे भावनिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 2.48 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे भावनिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

- आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे लैगिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 1.25 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते. आईचा शैक्षणिक दर्जा व किशोरांचे लैगिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

**परिकल्पना क्र. २:** कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध नाही.

**अर्थनिर्वचन:**

- वरील सारणीचे तुलनात्मक अध्ययन केले असता, कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे सामाजिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 2.28 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, याठिकाणि शून्य गृहितकाचा स्विकार होतो कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे सामाजिक वर्तन यात सार्थक संबंध नाही असे निदर्शनास आले.

- तसेच कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे असामाजिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 3.75 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे असामाजिक वर्तन यात सार्थक संबंध नाही असे आढळून आले.

- कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे नैतिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 4.7 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे नैतिक वर्तन यात सार्थक संबंध नाही असे आढळून येते.

- कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे भावनिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 5.25 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे भावनिक वर्तन यात सार्थक संबंध नाही असे आढळून आले.

- कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे शारीरिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 4.47 सारणी मूल्य 16.9 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे शारीरिक वर्तन यात सार्थक संबंध नाही असे आढळून येते.

**परिकल्पना क्र. ५:** कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध असतो.

**अर्थनिर्वचन:**

- वरील सारणीचे तुलनात्मक अध्ययन केले असता, कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे सामाजिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 12.66 सारणी मूल्य 12.59 एवढेच

आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे सामाजिक वर्तन यात सार्थक संबंध आहे असे आढळून आले.

- तसेच कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे असामाजिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 7.25 सारणी मूल्य 12.59 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे असामाजिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.
- कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे नैतिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 8.93 सारणी मूल्य 12.59 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे नैतिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.
- कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे भावनिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 5.05 सारणी मूल्य 12.59 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे भावनिक वर्तन यात सार्थक संबंध आढळून आला.
- कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे शारीरिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 5.07 सारणी मूल्य 12.59 पेक्षा कमी आहे. म्हणून आपली परिकल्पना सत्य ठरते, कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे शारीरिक वर्तन यात सार्थक संबंध आढळून आला.
- कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे लैगिक वर्तन याचे परिगणीत मूल्य 1.07 सारणी मूल्य 12.59 पेक्षा जास्त आहे. म्हणून आपली परिकल्पना असत्य ठरते, याठिकाणि शून्य गृहितकाचा अस्विकार होतो कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे लैगिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले.

**निष्कर्ष:**

वरील परिणामांद्वारे हे स्पष्ट होते की, पालकांचे शिक्षण व किशोरांचे वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आले. आईवडिल शिक्षित असल्यास शास्त्रीय दृष्टिकोणातून किशोरांना योग्य मार्गदर्शन करू शकतात ज्यातून किशोरांच्या सामाजिक, भावनिक, नैतिक वर्तन योग्य घडू शेकते व समाजविघातक वर्तनापासून परावृत्त देखील करू शकतात. कुटुंबातील सदस्य संख्या व किशोरांचे वर्तन यात देखील सार्थक संबंध असल्याचे आढळून आले. म्हणजेच मर्यादित सदस्य संख्या असल्यास आपल्या मुलांवर लक्ष केंद्रीत करून योग्य वळन लावता येते. कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे वर्तन यात देखील सार्थक संबंध असल्याचे आढळून आले. परंतु कुटुंबाचा प्रकार व किशोरांचे सामाजिक व लैगिक वर्तन यात सार्थक संबंध असल्याचे आढळून आला नाही.

किशोरांचे इतर वर्तन लक्षात घेता दिवसभरातील १ ते २ तास मोबाईल हाताळणाऱ्यांचे प्रमाण ५५ टक्के एवढे आढळून आले. मोबाईलवर १ ते २ तास व्हिडीओ गेम खेळणाऱ्यांचे प्रमाण ६७ टक्के एवढे तर सोशल मिडीयाचा वापर करणाऱ्यांचे प्रमाण ४५ टक्के Internet व Social Media चा किशोरांच्या वर्तनावर होणाऱ्या परिणामाचे प्रमाण पाहाता इतरांशी आंतरक्रीया कमी झाले आहे असे ४१.६७ टक्के किशोर आढळून आले. किशोरांचा कुटुंबाशी असलेल्या आंरक्रियेवर त्यांचा नैतिक, सामाजिक व भावनिक विकास व वर्तन अवलंबून असतो हे यातून निदर्शनास येते.

**उपाययोजना:**

पालकांनी आपल्या किशोरांने फार स्वातंत्र्य देऊ नये व फार संरक्षणही करू नये. किशोरांच्या वर्तनाला योग्य दिशा देण्यास व त्यांच्या भावनांना योग्य दिशा मिळण्यास काही क्रिया कौशल्य व खेळ यामध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करावे. यामुळे बालक आत्मनिर्भर होतील व समाजात समायोजन साधू शकतील. पालक-बालकांमध्ये योग्य संप्रेषण असायला हवे योग्य संप्रेषणच्या अभावाने किशोरांमध्ये मानसीक अस्थीरता निर्माण होते. पालकांनी दक्षता घ्यायला हवी की त्यांच्या समाजोआर्थिक स्थितीचा प्रभाव किशोरांवर पडू नये. शिक्षकांद्वारे विद्यार्थ्यांसोबत योग्य व परस्पर सहयोगात्मक संबंध निर्माण व्हावे.

**संदर्भ :**

र. वि. पंडित (जून २००९) शैक्षणिक मानसशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृष्ठ १२६-१२७

प्रा. हिवरे, तडसे, वैकासिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ ४३

पुरूषोत्तम बोरकर (जानेवारी २००९) मानसशास्त्र मानवी वाढ व विकास, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, पृष्ठ ९७-९८

डॉ. अल्का डेविड,(१९९९) किशोरावस्था विवाह एव पारिवारिक जीवन, शिवा प्रकाशन, इन्दौर, पृष्ठ ९, १०

डॉ. शशिकांत खलाणे, ऑगस्ट २०१४, ''वैकासिक मानसशास्त्र'', अथर्व पब्लिकेशन्स्, धुळे. पृष्ठ १२८

डॉ. स्फुर्ती कतरणी, जून २०१२, ''मानसशास्त्र मानवी वाढ व विकास'', श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, पृष्ठ ७६, ७७

रूषोत्तम बोरकर (जानेवारी २००९) मानसशास्त्र मानवी वाढ व विकास, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर, पृष्ठ १११, ११२

रणजित कुमार. ''संशोधन पद्धती'', सॅग पब्लिकेशन्स्, इंडिया पीव्हीटी एलटीडी, न्यू दिल्ली, प्रथमावृत्ती २०१७, पृष्ठ क्र. ८९, ९३

डॉ. सुधीर बोधनकर, प्रा. विवेक अलोणी, ॲड मृणाल कुलकर्णी ''सामाजिक संशोधन पद्धती'', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर सुधारीत सहावी आवृत्ती २०११, पृष्ठ क्र. ३९१, ३९२

डॉ. बी. एम. कऱ्हाडे, ''शास्त्रीय संशोधन पद्धती'', पिंपळापूरे ॲण्ड कं पब्लिशर्स, नागपूर. प्रथमावृत्ती २००७, पृष्ठ क्र. ४१५, ४३३

LargestPCB CAD Library, https://www.mycoaching.in/2020/02/ problems-of-adolescence-stage.html?m=1) https://mr.wikipedia.org/s/3jpz

Qidwai W, Ishaque S, sShah S, Rahim M (2010) Adolescent Lifestyle and Behaviour: A Survey from a Developing Country. PLoS ONE 5(9): e12914. doi:10.1371/journal.pone.0012914

Y. A. Jogsan and B. K. Aashra, (2013) Family Relationship and Social Behaviour in Children relation to their birth order. International Journal of Advancement in Research & Technology Vol.2 (6), 183-191

Neogi, Susmita and Das, Chameli (Aug. 2017) Impact of family relationship on risk-taking behavior among college students, International Journal of Development Research 7(08), 15426-15430.

Lu Liu, Na Wang and Lumei Tian, (2019) "The Parent-Adolescent Relationship and Risk-Taking Behaviors Among Chinese Adolescents: The Moderating Role of Self-Control" (March 2019) ORIGINAL RESEARCH ARTICLE, Front. Psychol., School of Psychology, Shandong Normal University, Jinan, China